महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई ३२.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय म.राज्य, पुणे द्वारा

राज्यात क्रीडा सुविधा निर्माण करण्यास आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत

(शासन निर्णय :- राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१ दि.१ मार्च, २०१४.)

**क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्याबाबत करावयाच्या अनुदान मागणी अर्ज**

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नांव | |
| २ | संस्थेचा प्रकार (शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी/क्रीडा मंडळे इत्यादी) | |
| ३ | संस्थेचा सविस्तर पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ईमेल. | |
| ४ | संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक. (प्रत जोडावी) | |
| ५ | संस्थेची ध्येय व क्षेत्र. (प्रत जोडावी) | |
| ६ | संस्थेचे सध्या कार्यरत असलेल्या पदाधिका-यांची नावे (प्रत जोडावी) | |
| ७ | जमिनीचा तपशिल. **(जागेची कागदपत्रे अर्जासोबत सादर करावीत.)** | |
| ८ | जागेचा प्रकार (वर्गवारी) | |
| ९ | जागेचे मुल्यांकन (बाजारभावाप्रमाणे) | |
| १० | जागेबाबतचे आरक्षणाबाबत संबंधित यंत्रणेचा अधिकृत पुरवा. | |
| ११ | संस्थेकडे एकुण असलेल्या जागेचा (आराखडा) प्लॅन. (संकल्पित नकाशा) | |
| १२ | प्रकल्पासाठी लागणारी जागा ही स्वत:च्या मालकीची / दिर्घ मुदतीच्या कराराने (१५ वर्ष किंवा अधिक) आहे किंवा नाही याबाबतचा तपशिल. **(अर्ज करणा-या संस्थेकडे अर्ज करित असताना उपरोक्त नमूद केलेल्या १५ वर्षामधील करारापैकी अर्ज करतेवेळी किमान १० वर्षे पुढे करार असणे आवश्यक राहील.)** | |

| | | |
|---|---|---|
| १३ | जमिनीच्या मालकी हक्क पुराव्यासाठी ७/१२ चा उतारा किंवा दिर्घ मुदतीच्या करारावर (किमान) असलेल्या जमिनीबाबत पुरावा दर्शविणारे करारपत्र. नोंदणीकृत असणे आवश्यक. | जमिनीच्या मालकी बाबतची कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील. |
| १४ | संस्थेकडील एकूण जमिनीपैकी क्रीडांगणासाठी राखून ठेवलेल्या जमिनीबाबतचे हमीपत्र. | |
| १५ | शासकीय अनुदान घेण्याविषयी व संबंधित बाबींवरील संस्थेचा हिस्सा खर्च करण्याविषयी संस्थेच्या कार्यकारणीच्या ठरावाची सत्यप्रत सादर करावी. | |
| १६ | प्रकल्पाचे ठिकाण आदिवासी डोंगराळ क्षेत्रात आहे / इतर क्षेत्रामध्ये आहे. | संस्था आदिवासी /डोंगराळ भागात येत असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे पत्र. |
| १७ | प्रकल्पाचे नांव व प्रकल्प ज्या ठिकाणी विकसित करण्यात येणार आहे त्या ठिकाणचा सविस्तर पत्ता. | |
| १८ | प्रकल्पाची अंदाजित रक्कम<br>सन............च्या डीएसआर (DSR) रेटनुसार | |
| १९ | अंदाजपत्रक व आराखडे तयार करणा-या यंत्रणेचे नांव व पत्ता. | |
| २० | प्रकल्पाचे अंदाजपत्रक, आराखडे शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम अधिका-याने/ नोंदणीकृत सक्षम अभियंत्याने/वास्तुविशारदाने मान्य केलेले असावेत.<br>**(मान्यतेबाबत संबंधितांचा सही व शिक्का आवश्यक आहे.)** | |
| २१ | प्रकल्पाच्या बांधकामाची परवानगी सक्षम स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेली याचा तपशिल जोडावा.<br>**(परवानगी बाबतची आवश्यक कागदपत्रे जोडावीत)** | |
| २२ | सदर प्रकल्पाकरिता अन्य कोणत्या संस्थेकडून / केंद्रशासनाकडून / इतर माध्यमातून अनुदान प्राप्त झाले असल्यास नाव, वर्ष व रक्कम नमूद करावी. | |
| २३ | निर्माण करण्यात येणा-या क्रीडा सुविधेची आवश्यकता काय याबाबत समर्थनीय माहिती सादर करावी. (उदा. खेळाडू संख्या , त्यांचे प्राविण्य, खेळाडूंची कामगिरी इत्यादी.) | |

| | | |
|---|---|---|
| २४ | प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या किमान २५ टक्के रक्कम स्वत:चा हिस्सा प्रथम खर्च करणे आवश्यक आहे त्याबाबतचे हमीपत्र. | संस्थेचे बँकेत शिल्लक असलेली रक्कम दर्शविणारा बँकचा दाखला तसेच सदरची रक्कम प्रकल्पासाठी राखून ठेवलेली आहे याबाबत संस्थेचा ठराव व हमीपत्र जोडावे. |
| २५ | संस्थेच्या बँक खाते बाबतचा तपशिल<br>• बँकचे नांव २. बँक खाते क्रमांक ३. IFSC कोड नंबर इत्यादी. ४.बँक खाते कोणाच्या सहीने कार्यान्वित आहे. | |
| २६ | संस्थेचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचे ओळखपत्र (फोटोसह) | शासकीय अधिका-यांकडून साक्षांकित केलेले असावे. |
| २७ | प्रकल्पाची अंदाजित रक्कम शासन मर्यादा रक्कमेच्या आत / बरोबर नसल्यास अधिकचा येणारा खर्च संस्था कशाप्रकारे उभा करणार याबाबतची माहिती. | |
| २८ | प्रकल्प कुठल्याही कारणामुळे मुदतीत / निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण न होऊ शकल्यास व अशा परिस्थितीत डीएसआर (DSR) रेट व बांधकाम अंदाजपत्रकामध्ये वाढ झाल्यास संस्था स्वबळावर आर्थिक उपाययोजना करुन निधी उभारुन प्रकल्प पूर्ण करेल याबाबतचे हमीपत्र. | |
| २९ | प्रकल्पास तत्वत: मान्यता दिल्यानंतर संस्थेने प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या किमान २५ टक्के रक्कम खर्च केल्यानंतर बांधकामची सद्यस्थिती दर्शक अहवाल, बांधकामाचे फोटो, सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे लेखाविवरणपत्र सादर करावे लागेल. **(सोबत जोडलेल्या प्रगती अहवालाच्या विहित नमुन्यात)** | |
| ३० | संस्थेच्या क्रीडाविषयक कामगिरीचा गत वर्षाचा अहवाल. विशेषता ज्या प्रकल्पाकरिता अनुदान प्रस्ताव सादर केला आहे त्याबाबतची माहिती थोडक्यात सादर करावी. | |
| ३१ | संस्थेने प्रकल्पावर केलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र सोबत जोडावे. | |
| ३२ | शासन अनुदान वितरित केल्यानंतर सदर अनुदानाचा विनियोग एक वर्षाच्या आत करुन विनियोग प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील ही अट मान्य असल्याचे प्रमाणपत्र. | |
| ३३ | शासनाचे अनुदान पूर्णपणे वितरित झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्रकल्पाच्या छायाचित्रासह व उपयोगिता प्रमाणपत्रासह सादर करणे बंधनकारक | |

| | | |
|---|---|---|
| | राहील. अन्यथा वितरित अनुदान शासनाच्या प्रचलित व्याज दराने अनुदान वितरित झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल ही अट मान्य असल्याचे प्रमाणपत्र. | |
| ३४ | प्रकल्प अपूर्ण राहिल्यास वितरित अनुदान शासनाच्या प्रचलित व्याज दराने अनुदान वितरित झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल ही अट मान्य असल्याचे प्रमाणपत्र. | |
| ३५ | अनुदान मंजूर झाल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या क्रीडा सुविधा शासकीय उपक्रमासाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच सभासद / विद्यार्थी यांच्याशिवाय सदर सुविधा अल्पदरात इतर खेळाडूंना उपलब्ध करुन देण्यात येईल याबाबतचे हमीपत्र. | |
| ३६ | संस्था शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेत नियमितपणे सहभागी होईल याबाबतचे हमीपत्र. | |
| ३७ | क्रीडा सुविधा निर्मितीसाठी मंजूर अनुदानाव्यतिरिक्त बांधकामावर होणारा अधिकचा खर्च संबंधित संस्था करणार असल्याचे हमीपत्र. | |
| ३८ | निर्माण केलेल्या सुविधेच्या देखभालीचा खर्च संस्था करेल याबाबतचे हमीपत्र. | |
| ३९ | निर्माण केलेल्या सुविधेचा वापर क्रीडा विषयक बाबींकरिताच केला जाईल, इतर कारणांसाठी करता येणार नाही याबाबचे संस्थेचे हमीपत्र. | |
| ४० | संस्थेने क्रीडा सुविधाच्या वापराबाबतची नियमावली व आकारण्यात येणा-या फि बाबतचा सविस्तर अहवाल सोबत जोडावा. | |
| ४१ | प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाची देखभाल कशाप्रकारे करण्यात येणार याबाबतचा तपशिल सादर करावा. | |
| ४२ | सदर क्रीडा सुविधा पूर्ण झाल्यावर सदर सुविधेचा वापर योग्य पध्दतीने होण्याकरिता सदर खेळाचे क्रीडा प्रशिक्षक संस्थेकडून नेमण्यात येईल याबाबतचे हमीपत्र.<br>(क्रीडा प्रशिक्षक नेमलेले असल्यास माहिती द्यावी.) | |
| ४३ | सर्व हमीपत्रांबाबतचा उल्लेख हा १०० रु. च्या | |

| | | |
|---|---|---|
| | बंधपत्रावर करण्यात यावा. | |
| ४४ | प्रशासकीय बाबींच्या खर्चासाठी मंजूर अनुदानाच्या २ टक्के निधी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्याबाबत संस्थेचे संमती पत्र जोडावे लागेल. | |

प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो की, या अर्जासोबत अनुदानाकरिता जी माहिती दिली आहे ती मी संपूर्णपणे वाचली असून त्याप्रमाणे अर्जात भरलेली माहिती खरी आहे. अर्जा सोबत सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास होणा-या कार्यवाहीस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल.

(सदर मजकुर अर्जदार व संस्था प्रमुख यांनी संयुक्त स्वाक्षरीसह सादर करावी लागेल.)

ठिकाण :-

दिनांक :-

**अध्यक्ष / सचिव यांची स्वाक्षरी**
**(नांव व शिक्कासह)**

......

## जिल्हा क्रीडा अधिकारी, ................ यांचा प्रत्यक्ष संस्था तपासणी

## अहवाल व शिफारस

........................................ या संस्थेने सादर केलेल्या ......................... प्रस्तावाच्या अनुषंगाने मी ...................................... जिल्हा क्रीडा अधिकारी, .................. दि............... रोजी प्रत्यक्ष ................................................ या संस्थेस भेट दिली.

संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी केली असून सदर संस्थेने अर्जासोबत सादर केलेली माहिती व कागदपत्रे ही खरी असून संस्था अर्जातील व शासन निर्णयात नमूद असलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता पूर्ण करित आहे.

सबब संस्थेने सदर प्रकल्पाकरिता मागणी केलेली अनुदान रक्कम रु. .......... मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

स्वाक्षरी/-

संबंधित कार्यालयाचे

क्रीडा अधिकारी /**कर्मचारी**

स्वाक्षरी/-

( )

जिल्हा क्रीडा अधिकारी,..........

.....................................................................................................................

**विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा .............विभाग, ........ यांची शिफारस**

......................या संस्थेने सादर केलेला प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी......... यांच्याकडून दि. ............ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची या कार्यालयाकडून तपासणी करण्यात आली असून सदर संस्थेने अर्जासोबत सादर केलेली माहिती व कागदपत्रे ही खरी असून संस्था अर्जातील व शासन निर्णयात नमूद असलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता पूर्ण करित आहे.

सबब संस्थेने सदर प्रकल्पाकरिता मागणी केलेली अनुदान रक्कम रु. .......... मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

स्वाक्षरी/-

संबंधित कार्यालयाचे क्रीडा अधिकारी /**कर्मचारी**

(नाव व पदनामासह)

स्वाक्षरी/-

( )

विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, ..........विभाग ........
..........